Kamala College Kolhapur, Krantiveer Rangoodada Patil Library
LIBRARY

**A - 124**

**Total No. of Pages : 3**

| **Seat No.** | |
|---|---|

# B.A. (Part - I) (Semester - II) Examination, April - 2019

## मराठी (MARATHI) (Paper - II)

## अक्षरबंध

## विद्याशाखीय विशेष गाभा (DSC-A13)

## Sub. Code : 71262

**Day and Date : Monday, 08 - 04 - 2019** **Total Marks : 50**

**Time : 12.00 noon to 02.00 p.m.**

**सूचना : 1) उजवीकडील अंक गुण दर्शवतात.**

**2) सर्व प्रश्न सोडविणे आवश्यक आहे.**

**प्र.1)** योग्य पर्याय निवडा. **[10]**

i) कवीला त्याच्या मुलांची नावे विचारल्यावर लहानग्याचे ............... असे नाव कवी सांगतो.

अ) मुक्तछंद ब) समुद्र

क) आकाश ड) निरव

ii) ''शहरात राहूनही तुम्ही समजत नाही यार ............ असा एकाएकी तोडायचा नसतो''.

अ) माणूस ब) मित्र

क) भाऊ ड) शेजारी

iii) आता तो बेटा माझ्या ............... झाला आहे.

अ) शरीराएवढा ब) उंचीएवढा

क) खांद्याएवढा ड) कमरेएवढा

iv) .............. समोरून गेले तरी, बघत नाहीत माझ्याकडे आजकाल.

अ) मंत्रीसाहेब ब) वकिलसाहेब

क) फौजदारसाहेब ड) डॉक्टरसाहेब

v) ''किती सोपं असते पैसे कमविणं'' शिकले पण ........... नाही.

अ) सवरले ब) आवरले

क) पसरले ड) अनुभवले

*P.T.O*

vi) इथे ............ मैत्री जन्मते नि काम फत्ते होताच अकाली मरते.

अ) संबंधातून ब) नात्यातून

क) गरजेतून ड) अपघातातून

vii) ................ उतरणीवरही तुम्ही आपलं स्वत:चं काही सांगत नाही.

अ) दिवसाच्या ब) आयुष्याच्या

क) जीवनाच्या ड) शिक्षणाच्या

viii) महासत्ता उद्ध्वस्त करीत असलेले तिसऱ्या ................. लोकजीवन सगळाच महासंताप.

अ) देशातील ब) जगातील

क) लोकांतील ड) युद्धातील

ix) अनेक हलिउतार लोक .............. पोसतात, खाऊ घालतात बकऱ्याची मुंडी, घेतात मुके अगणित त्यांचे.

अ) मुले ब) मांजर

क) कुत्रे ड) जनावेर

x) युद्ध कुणाला हवे असते, तरीही ................. होतच असते.

अ) तह ब) हाणामारी

क) संघर्ष ड) युद्ध

**प्र.2)** दिर्घोत्तरी प्रश्न. **[10]**

भविष्य सांगणारी व ते बघणारी वृत्ती समाजात आढळते. याचे चित्रण लोकनाथ यशवंत यांनी 'भविष्य' या कवितेत कसे रेखाटले आहे ते स्पष्ट करा.

किंवा

शहरी संस्कृतीत सतत तडजोड करावी लागते. याचे कवी लोकनाथ यशवंत यांनी 'तडजोड' कवितेतून दर्शन कसे घडविले आहे? ते तुमच्या भाषेत सांगा.

**प्र.3)** दिर्घोत्तरी प्रश्न. **[10]**

'स्पर्श' कवितेतील कवी मनाची संवेदनशीलता माणुसकीसाठी भुकेलेली वाटते काय? ते विशद करा.

किंवा

'जन्म आईचा' या कवितेतून कवीची चिंतनशीलता कशी जाणवते ते कवितेच्या आधारे सांगा.

**प्र.4)** लघुत्तरी प्रश्न. (कोणतेही दोन लिहा) **[10]**

अ) बातमीदाराकडे कोणते गुण असले पाहिजेत. चर्चा करा.

ब) तुमच्या महाविद्यालयातील मराठी भाषा दिनानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमाची वर्तमानपत्रासाठी बातमी तयार करा.

क) चित्रपट : दृक-श्राव्य कला आहे याचे स्पष्टीकरण द्या.

Kamala College Kolhapur, Krantiveer Rangraodada Patil Library ★ LIBRARY

**प्र.5)** लघुत्तरी प्रश्न. (कोणतेही दोन लिहा) **[10]**

अ) पत्रलेखनाची संज्ञा व स्वरूप स्पष्ट करा.

ब) तुमच्या घरासमोरील रस्त्यावर पडलेले खड्डे बुजवण्यासाठी रस्ते महामंडळाला तक्रार अर्ज तयार करा.

क) ई-टपाल (e-mail) संकल्पनेची चर्चा करा.

ड) आकलन हे एक महत्वाचे भाषिक कौशल्य आहे कसे ते पटवून द्या.

♣ ♣ ♣